|| अनुभव ||



केतकी घाटे

# जंगल : एक अनपेक्षित साहस सुध्दा

जंगल मोठं अभूतपूर्व असतं. कितीही भीतीदायक असलं तरी पुन:पुन्हा जावंसं वाटतं.

वरसगांव धरणच्या पाणलोटक्षेत्राचा अभ्यास करत होतो तेव्हाची गोष्ट : या भागातलं परमोच्च स्थितीला पोहचलेलं जंगल बघणं, तिथल्या जैवविविधतेचं सर्वेक्षण करणं हे आम्ही हातात घेतलेल्या कामाच्या दृष्टीने महत्त्वाचं होतं. दगडू मामांना विचारलं असं उत्तम जंगल आहे का कुठं जवळपास. तर समोरच्या डोंगराकडे हात करून म्हणाले, ''हाये की जवळच... हा झेंड्याचा हौद चढून जायचा, त्येच्या मागत्या बाजून खाली उतरायचं, मग परत ऐक डोंगर चढायचा अन त्यो उतरला की आलंच की त्ये रान'' ''मग बरंच लांब आहे की हो दगडू मामा'' ''लांब कंच? आता तुमच्यासारख्याला असंल लांब, आमी तर जातू एखाद्या तासांत''. ''तुम्ही काय करता जाऊन तिथं?'' (तेव्हा आम्हाला गावातल्या लोकांच्या राहणीमानाची फारशी माहिति नव्हती.) ''आमी जातू शिकारीला.. देव बी हाये आमचा तिथं.'' ''काय शिकार मिळते तिथे?'' ''डुकरं, पिसारा तर नेहमीचच पण सांबर बी गावतं कधीमधी.'' आम्हा तिघींचेही कान टावकारले. ''सांबर?'' ''हा .....अवं ठिपक्यावाला वाघ (म्हणजे बिबट्या) बी दिसतो कधी मधी, पन त्याला नाय मारत आमी.'' हुश्श... मी म्हटलं, ''दगडूमामा, लई भारी

दिसतंय तुमचं हे जंगल''...... ''तर काय, एकट्या दुकट्यानं जायचं कामच नायं, जंगलात शिरलं की, सूर्याचं दरशनच होत नाय.'' दुसऱ्या दिवशी जायचं ठरलं.



पहाटेच झेंड्याच्या हौद्याच्या दिशेनी आम्ही कूच केलं. तीव्र उतार चढत असतांना दमछाक होत होती. कड्याच्या बाजूने चढत असताना पर्वत कस्तुराचं दर्शन झालं. काळ्या पाषाणाच्या पार्श्वभूमीवर हा निळाशार पर्वत कस्तूर मोठा देखणा दिसत होता. चांगल्या प्रतीच्या जंगलाचं द्योतक असणारा हा पक्षी पाहिल्यावर आम्ही आनंदलो. दिवस चांगला जाणार असं वाटून गेलं. परंतु पुढे काय वाढून ठेवलंय याची मात्र आम्हांला मुळीच कल्पना नव्हती. चढ पूर्ण चढून गेल्यावर आता तो उतरायचा होता. पण पुढची चढण चढेपर्यंत सूर्य तसा बऱ्यापैकी वर आला होता. कारवीच्या दाटीतून वाट काढत आम्ही चालत होतो, चालत होतो. कधी एकदा सावली येईल असं झालं होतं. चढ चढून वर पोचलो मात्र समोरच्या दृश्याने आम्ही केवळ स्तंभित झालो. उत्तम उंचच उंच सदाहरित जंगलाने अख्खा परिसर व्यापला होता. आम्ही तिघीही झाडाची सावली बघून तिथून अख्ख्या रानाचं निरीक्षण करत होतो. दगडूमामा मात्र भराभर पुढे गेले. तोच अचानक अत्यंत मोठ्ठा आवाज आला. पाठोपाठ अजून एकदा आला. अगदी बिबट्याची डरकाळी असावी असा. आम्ही जाम टरकलो. म्हणलं काय हा आवाज, तोच परत एकदा तोच आवाज. एक तर अगदी जवळून येत होता. दगडूमामांना हाका मारल्या पण ते परत येईपर्यंत दम निघत नव्हता. असेलच बिबट्या तर करायचं काय? दगडूमामा परत आले तेव्हा जिवात जीव आला. पण आवाजाचं रहस्य काही उलगडेना. दुर्बीण डोळ्याला लावून आमचा शोध चालूच होता पण एवढ्या दाट रानात खाली काय चाललंय कसं कळावं? तेवढ्यात एक अत्यंत मोठ्ठा पक्षी पंखांचा खाप खाप असा मोठा आवाज काढत आणि मगाचाच कॉल देत एका बाजूच्या जंगलातून बाहेर पडला आणि दुसऱ्या बाजूला जाऊन बसला. मानसीने लगेचच ओळखला. Great pied hornbill नर आणि मादी एकमेकांना कॉल्स देत होते तर! मोठा प्राणी नाही म्हणून जरा हुश्श वाटलं,पण पक्षी एवढा मोठा आवाज काढून एवढं घाबरवू शकतो यावर माझा विश्वासच बसत नव्हता. विलक्षण असा तो अनुभव होता. याहूनही काही विलक्षण पुढे आहे असं मला अजिबातच वाटलं नाही. पक्षीच आहे हे माहीत असूनही घाबरायला होतं हे नक्की. नंतर अगदी अलीकडे M.Arch.च्या विद्यार्थिनींना घेऊन मी काळूबाईच्या देवराईत गेले होते. तिथले मोठे वृक्ष, गर्द अंधार पाहून ह्या शहरी मुली आधीच बुजल्या होत्या. त्यातून अचानक या Great pied hornbillनं त्याचा मोठा आवाज काढत हजेरी लावली मात्र,

आणि सगळ्याजणी चिडीचूप शांत झाल्या. काही जणी इतक्या घाबरल्या की, हलायलाही तयार होईनात. ८-१० वर्षांच्या जंगलाच्या अनुभवानी मी जरी धीट झाले असले तरी त्या गर्द राईचं,मुलींच्या शांतपणाचं मलाही किंचित दडपण आलं आणि आम्ही लगेचच तिथून बाहेर पडलो.

आता समोर उतारावरचं अत्यंत दाट जंगल खुणावत होतं. आत शिरून उतरायला लागलो मात्र आणि ऊन अचानक नाहीसंच झालं. अत्यंत उंच मोठ्या खोडाची डेरेदार झाडं एकमेकात अशी काही गुंतलेली होती की, किरणांना जरा सुध्दा वाव नव्हता. थकवा एकदम दूर झाला. आम्ही झाडांच्या जाती पाहण्यात गुंगलो.एक सुंदर पंखयुक्त बी खाली पडलेली दिसली. केवळ चांगल्या जंगलातच असणारा तसा दुर्मीळ असा हा 'हरदळ' नावाचा वेल इथेही आहे तर. दरम्यान लक्षात असं आलं की, हा उतार अत्यंत तीव्र असा आहे. पायात गोळे आले आहेत. भरपूर पालापाचोळा असल्याने केवळ आम्ही उतरू शकत होतो, नाही तर ही घसरगुंडी अशक्यच होती. अजून पाऊण एक तासात आम्ही ओढ्यापाशी पोचलो. जिवंत पाण्याचा हा ओढा पाहून मन प्रसन्न झालं. जंगलाची महती लगेचच पटली. जरा ओढ्यात चालत पुढे गेलो. मे महिन्यातला ओलावा सुखद होता. एक आडवं पडलेलं झाड दिसलं म्हणून आम्ही त्या झाडावर दोन्हीकडे दोन पाय टाकून मजेत बसलो. पक्षी बघत होतो तोच पायावर काहीतरी ओलसर लागलं.पाहिलं तर एक अळीसारखा इंचभर प्राणी होता. तेवढ्यात मृणाल जोरात किंचाळली, ''अगं, चल पळ इथे प्रचंड 'जळवा' आहेत.'' ओ! जळवांविषयी मी केवळ ऐकलं होतं. त्या अंगाला चिकटतात आणि फुगून टम्म होईपर्यंत रक्त पितात! माझ्या अंगावर सर्रकन काटा आला. खाली पाहिलं तर एक नाही दोन नाही तर चांगल्या पन्नास एक जळवा माझ्या पायाखाली होत्या. थेट मेंदूपर्यंत मुंग्या गेल्या. उतरायचं तरी कसं. पायावरची चढलेली जळू मी टिचकीने उडवली होती. पाय वर घेऊन बसून राहिले. या सगळ्या जळवा माझ्याकडे बघून ''कधी तरी खाली उतरशीलच ना!'' असं म्हणताहेत की काय असं मला वाटलं. त्यांची संख्याही आता दुप्पट, चौपट जणू अख्ख्या जंगलभर आहे की काय असं वाटू लागलं. बूट खालीच होते पण त्यावर त्या चढत नव्हत्या. मृणाल परत ओरडली, अगं उतर, वरून झाडावरून सुध्द पडतात अंगावर.बाप रे! आता मात्र माझं होत नव्हतं तेवढं सगळं धैर्य गळलं. महाजन सरांनी सांगितलेली एक गोष्ट आठवली. एक वनाधिकारी अशाच जंगलात गेलेला असतांना केवळ जळवा लागून रक्त संपल्याने मेला!! धूम ठोकण्याशिवाय काही पर्याय नव्हता. कसेबसे बूट उचलले आणि धावत सुटलो. मानसी म्हणाली, ''दगडांवर पाय देत जाऊ. त्या पालापाचोळ्यात असतात. तिथे पाय देऊ नकोस!'' मग काय ठेचकाळत, धडपडत, तोल सावरत पण अतिशय वेगात आम्ही विरुद्ध दिशेला धावत सुटलो. तीव्र उताराशी पोचलो आणि दगडूमामा दिसले. त्यांना ओरडून सांगितलं, ''दगडूमामा, जळवा आहेत की इथं!'' ते शांतपणे म्हणाले, ''हा, हायेत की. हे अख्खं रान जळवांचंच हाये. आम्ही त्येला कान्ट बोलतो.'' ''अहो म्हणजे काय ह्या उतारावर पण असणार का जळवा?'' ते म्हणाले, ''हो असू बी शकतात. कुठं कुठं ओल असेल तर असतात की''. झालं! हे म्हणजे आगीतून उठून फुफाट्यात पडण्यासारखं होतं. मार्ग तर हा एकच होता. मगाशी अर्ध्या तासात उतरलेला उतार आम्ही पंधरा मिनिटात चढून गेलो. जंगलाच्या बाहेर पडलो. आणि दुपारचं टळटळीत ऊनही बरं वाटू लागलं. निदान इथे तरी जळवा नव्हत्या. मग स्वस्थ बसून परत एकदा पाय तपासले, बूट तपासले, जळू कुठेच नव्हती. तरी तिच्या आठवणीनेच मनात प्रचंड धाकधूक होत



होती. दगडूमामा म्हणाले, ''मंग पाऊसाच्या टायमाला कसं काय येनार तुमी इकडं?, तवा तर अख्खं रान भरलेलं असतं कान्टांनी'' म्हणलं, ''छे! पावसात तर शक्यच नाही,पण परत उन्हाळ्यातही येऊ की नाही सांगता येत नाही.'' या प्रसंगाला झाली आता दहा वर्ष. आता माझं मलाच हसू येतं. त्या रानात नंतर आम्ही दोनदा जाऊन आलो. पहिल्या वेळेचं अपुरं राहिलेलं सर्वेक्षण पुरं केलं.

जंगल मोठं अभूतपूर्व असतं. कितीही भीतीदायक असलं तरी पुनःपुन्हा जावंसं वाटतं. गेल्या अनेक वर्षात कामाच्या निमित्ताने विविध प्रकारच्या जंगलात हिंडल्यामुळे भीती अशी राहिली नाही, पण विविध प्रकारचे अनुभव मात्र खूप घेतले. आणि दर वेळी ते वेगवेगळ्या प्रकारचे असतात. मजेदार, साहसी, आरोग्यविघातक. . .

एकदा आम्ही गोव्यातल्या मोलेमच्या जंगलात गेलो होतो. आमचा मित्र मंदार दातार तिथे पीएच.डी. करत होता. मोल्याचं जंगल म्हणजे आर्द्र पानगळी प्रकारचं. किंग कोब्राचं निवासस्थान असलेलं. पण मंदारच्या म्हणण्यानुसार कोब्रापेक्षाही भयंकर प्राण्याचा अनुभव आम्हांला मिळणार होता. दिवसभर जंगलात हिंडून संध्याकाळी परत राहण्याच्या ठिकाणी आलो. चहा घेऊन जरा विसावलो आणि सगळं शरीर खाजायला लागलं. अंगभर काहीतरी चालतंय असं जाणवायला लागलं, तपासलं तर काहीच दिसलं नाही.ओह! मंदार म्हणत होता तो भयंकर प्राणी हाच तर. टीक नावाचा अत्यंत सूक्ष्म असा हा किटक. किती सूक्ष्म तर केवळ पेनाच्या एका टोकाएवढा. मग आम्ही अत्यंत बारकाईने पाहिलं तर पायावर, पोटावर सुमारे ३० ते ४० टीकस मिळाल्या. नखावर घेऊन घेऊन त्या मारल्या. मग मात्र डोळे दुखायला लागले. वनविभागाच्या बेताचीच सोय असलेल्या त्या खोलीत अत्यंत मिणमिण्या पिवळा दिवा होता. बाहेर आले, मंदारला म्हणलं, ''अरे, लगेचच कढत पाण्याने अंघोळ करायला हवी, नाहीतर काही खरं नाही. तो हसून म्हणाला, ''अशी काहीच सोय इथे नाही. गार पाण्यानीच अंघोळ करावी

लागेल.'' बाप रे! थंडी तर इतकी होती की, गार पाण्यानी अंघोळ शक्यच नव्हतं. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आम्ही फोंड्याला आमच्या एका मित्राकडे जाणार होतो. पण तोवर या टीकस माझ्या शरीराची चाळणी करणार हे नक्की. रात्रभर अंग खाजत होतं. सकाळी उठूनही तेचं. आमची अक्षरश: माकडं झाली होती. मग आम्ही तिथल्या एका देवराईत गेलो. अत्यंत दाट अति विशाल बुंधे असलेले प्रचंड उंच वृक्ष, पिळेदार सर्वदूर पसरलेल्या वेली, मॉसनी गच्च भरलेले मोठ-मोठे खडक......देवराई फारच उत्तम स्थितीत होती. आम्ही वाट सोडून जरा आतल्या बाजूची विविधता पाहत हिंडत होतो. एका ठिकाणी जरा ड्रॉप होता म्हणून शेजारच्या झाडाला धरून मी पाय पुढे टाकला. हाताला काही तरी ओलसर लागलं. म्हणून मी परत वळले म्हणलं या ऋतूत झाडाच्या कोरड्या खोडावर काय ओला पदार्थ आहे. पहिलं तर खोडाच्या रंगरूपात बेमालूमपणे मिसळलेला एक बारकासा साप तिथे होता. मानसी, मंदार मागोमाग होतेच. मंदारने साप लगेचच ओळखला - ''मलबार पीट व्हायपरफ विषारी सापांपैकी एक! चक्क त्याच्या अंगावर मी हात ठेवला होता! पण तो विषारी आहे हे कळल्यावर माझं अख्ख अंग थरथरलं. त्या बापड्याचे मी आभार मानले आणि आम्ही पुढे चालू लागलो..........

पण या पीट व्हायपर पेक्षाही मोलेम आमच्या लक्षात राहिलं ते त्या टिकसमुळे. आमची मर्कट अवस्था नंतर दोन - तीन महिने टिकली होती. मिटींग चालू असताना मानसी अचानक डोळ्यांनी खुणावायची की लक्षात यायचं आपण नकळत स्वप्नवत बसलोय. पण टिकसच हे दुखणं दरवर्षीच असं आहे थंडीच्या दिवसात सगळ्याच प्रकारच्या जंगलात या टिकस उदभवतात. आमचं काम तर असय की हातात असलेल्या प्रत्येक प्रकल्प जमिनीचं सर्वेक्षण करण्यासाठी प्रत्येक ऋतूत तिथे जावं लागतं. त्यामुळे थंडीतल्या टिकस काही सुटत नाहीत. फरक फक्त एवढाच की अनुभवमुळे आम्ही त्यांना दूर ठेवण्याच्या काही उपाययोजना आता करतो.

कधी तरी अगदीच वेगळे अनुभवही येतात. गेल्या काही महिन्यातलीच गोष्ट. आम्ही एका सर्वेक्षणाकरता चार जणांची टीम औरंगाबाद परिसरात पाठवली होती. हे चौघे वनस्पती शास्त्र, पक्षी, कीटक, सरपटणारे प्राणी या विषयातले तज्ञ होते. एके दिवशी रात्री दहाच्या सुमारास अचानक एकीचा फोन ''आम्हाला पोलीसांनी आडवलयं''. औरंगाबाद सारख्या कोरड्या प्रदेशात सरपटणारे प्राणी दिवसा दृष्टीस पडत नाहीत. त्यांच्या करता रात्रीच सर्वेक्षण करणं उचित ठरत. म्हणून आमची ही टीम रात्री शेतीच्या बाजूच्या माळरानावर हिंडत होती. तरुण मुला-मुलींना एकटं बघून पोलिसांनी हटकलं. प्राण्यांच्या सर्वेक्षणाविषयी सांगितल तर पोलिसांचा विश्वासच बसेना. त्यांना या विषयाची ना ओळख ना आवड. ते म्हणाले ''इथे कसले काही जीव दिसायला?''आता यांना माळरानातल्या जीवांची ओळख करून देण्याची तर वेळ नक्कीच नव्हती. पोलीस स्टेशनवर चला, म्हटल्यावर त्यांनी आम्हांला फोन केला. हे सगळं प्रकरण फोन वरून निस्तरतांना नाकी नऊ आले. टीममधल्या दोघी मुलींची काळजी पण वाटत होती. अगदी त्याच सुमारास वर्तमानपत्रात पोलिसांकडून मुलींवर होणाऱ्या गैरवर्तवणुकीच्या बातम्या झळकत होत्या. यामुळे काळजीत अजूनच भर पडत होती. आमच्या या मुली धीट म्हणून प्रकरण थोडक्यात मिटवलं. अशा वेळी जळवा, टिकस, रानडुक्करं बरी असं वाटायला लागतं. शहरात राहून निसर्गासाठी काम करणं हे कसं गैर ठरतं, याचं एक उदाहरणच आम्ही अनुभवत होतो. यातून काही गोष्टी शिकायलाही मिळाल्या. वाटीभर गोड दाण्यात एखादा खवट लागायचाच...........

●●